महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**परिपत्रक :-**

जा. क्र. : तंशिविकापु/शै.वि-३/२०२२-२३/शै.शुल्क/ 5140
दिनांक : ०२/११/२०२२ 02 NOV 2022

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था (पुणे विभाग)

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील संचालनालयांतर्गत असलेल्या पदविका तसेच व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काबाबत..**

**संदर्भ :** १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा. मुंबई यांचे पत्र जा.क्र. २अ/एडीएम/२०२२ /३६१ दि.०१.११.२०२२

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील संचालनालयांतर्गत असलेल्या व्यावसायिक पदवी-पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभून प्रवेश प्रक्रिया सुरु झालेल्या आहेत. या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती(अ) (ब) (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग या उमेदवारांना संबंधित विभागांमार्फत वेळोवेळी शिष्यवृत्तीसंदर्भात शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता विस्तारीत योजना लागू करण्यात आली आहे.

या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, सर्व संस्थांमध्ये तंत्रशिक्षण संचालनालय यांचेमार्फत आणि तांत्रिक व्यावसायिक पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत करण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (CAP) माध्यमातून प्रवेश प्राप्त होणाऱ्या उमेदवारांना त्यांच्या संवर्गाप्रमाणे शासनामार्फत शैक्षणिक शुल्क रक्कम शिष्यवृत्ती स्वरुपात अदा करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील उपरोक्त नमूद उमेदवारांनासुध्दा त्या त्या विभागामार्फत निर्गमित होणाऱ्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार शिष्यवृत्तीची रक्कम अदा होणार आहे.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश घेणाऱ्या उमेदवारांकडुन प्रवेशाच्या वेळी संबंधित शासन निर्णयानुसार देय शुल्क आकारण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणी संस्थाकडुन उमेदवारांना प्रवर्गनिहाय अनुज्ञेय शिष्यवृत्ती विचारात न घेता शुल्क आकारत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधित संस्थेविरुध्द कारवाई प्रस्तावित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- १. मा.संचालक,तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य मुंबई याना माहितीस्तव (कार्यसन क्र.२अ)
२. प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता